# विभक्त राहत असलेल्या पत्नीची हत्या

## मारेकरी पती फरार | राजेंद्र कॉलनी परिसरातील घटना




### फ्रेजरपुरा ठाण्यात मिसिंगची तक्रार

भाग्यश्री घरी न परतल्याचे पाहून तिची आई अक्षय लाडेच्या घरी पोहोचल्या होत्या. त्यावेळी त्यांना घराला कुलुप दिसले. त्यामुळे त्यांनी फ्रेजरपुरा पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरु केला असता, भाग्यश्रीच्या मोबाईलचे लोकेशन हे रेल्वेस्थानक परिसरातील असल्याचे आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी रेल्वेस्थानक येथे जाऊन पाहिले असता, तेथे भाग्यश्रीची गाडी दिसली आणि त्यात तिचा मोबाईल दिसला. त्यानंतर पोलिसांनी भाग्यश्रीच्या सासरी जाऊन तिच्या घराच्या दाराचे कुलुप तुटले. त्यावेळी भाग्यश्री ही बेडवर मृतावस्थेत आढळून आले. या घटनेच्या अनुषंगाने रात्री उशिरापर्यंत पोलिसांची गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती. आरोपी पसार झाला असून, पोलिसांची विविध पथके त्याचा शोध घेत आहे. या घटनेच्या माहितीवरून गुन्हे शाखेचे पथकदेखील घटनास्थळी दाखल झाले होते.

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** – कौटुंबीक वादातून पतीने पत्नीची धारदार शस्त्राने वार करून हत्या केली. भाग्यश्री अक्षय लाडे (28, रा. भवते लेआऊट, राजेंद्र नगर) असे मृतक महिलेचे नाव आहे. ही घटना 2 जानेवारी रोजी सायंकाळी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील राजेंद्र नगर स्थित भवते लेआऊट परिसरात प्रकाशझोतात आली. या घटनेनंतर पती फरार झाल्यामुळे पोलिसांचा संशय बळावला आहे. पोलिस पतीचा शोध घेत आहे.

माहितीनुसार, भाग्यश्री नामक तरुणीचे अक्षय लाडेसोबत सात वर्षांपूर्वी लग्न झाले होते. त्यांना पाच वर्षांची एक मुलगीदेखील आहे. दोघेही यशोदानगर ते महादेव खोरीदरम्यान भवते लेआऊट परिसरात राहत होते. तेच तिचे सासर होते. तर भाग्यश्रीचे माहेर हे राजेंद्र नगरात होते. काही दिवसांपासून पती-पत्नीचा काही कारणावरून वाद झाल्यानंतर पत्नी भाग्यश्री ही माहेरी निघुन गेली होती. त्यानंतर 1 जानेवारी रोजी रात्री भाग्यश्री ही तीच्या मोपेडने सासरी कपडे घ्यायला गेली. त्यावेळी तिचा पतीसोबत वाद झाला आणि त्याने पत्नीवर शस्त्राने वार करून तिची हत्या केली.

### नववर्षाची सुरुवात देवदर्शनाने



अमरावती- अनेकांनी नववर्षारंभी देवदर्शन करण्याचा संकल्प घेतला. त्यामूळे शहरातील अंबादेवी, एकविरा देवी, साईबाबा मंदीर, गजानन महाराज मंदीरात मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी पहायला मिळाली. ( छायाचित्र-मनिष जगताप )

# मद्यपी पतीने पेटविले घर

## बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** – दारूच्या नशेत पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत मद्यपी पतीने स्वत:च्याच घराला आग लावली. ही घटना 31 डिसेंबर रोजी रात्री बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. पत्नीच्या तक्रारीवरून पोलिसांनी पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या महिलेने तक्रारीत म्हटले आहे की, पतीला दारूचे व्यसन आहे. तो पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करतो. याला कंटाळून ही महिला 15 दिवसांपूर्वी तिच्या आईकडे गेली होती. सदर महिलेचे घर तिच्या नावावर आहे. त्यामुळे आरोपी पती तुझे घर जाळून टाकू, अशी धमकी देत असे. 31 डिसेंबरच्या रात्री आरोपी पतीने घराला अक्षरश: आग लावून पळ काढला. या आगीत घरातील सोफा, दिवाण, टीव्ही, खिडक्या जळून खाक झाल्या. आगीत सुमारे 80 हजार रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती मिळाली आहे. परिसरातील लोकांकडे मोबाईल क्रमांक नसल्याने हा प्रकार महिलेला 1 जानेवारी रोजी कळला. त्यानंतर महिलेने याप्रकरणी बडनेरा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी पतीविरुद्ध कलम 326 (6) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# अपघातग्रस्त कारमधून साहित्य चोरणाऱ्याला अटक

## आष्टी ते टाकरखेडा संभू मार्गावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** – वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आष्टी ते टाकरखेडा संभू रस्त्यावर अपघात झालेल्या ओमनी कारमधील साहित्य चोरी करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. तर दुसरा आरोपी तेथून पळून जाण्यात यशस्वी झाला. लोकेश राजेंद्र पाटेकर (23, रा. चिमणापूर, भातकुली) असे अटक आरोपीचे नाव आहे. तर दुसरा आरोपी शुभम गाडे (23) घटनास्थळावरून पळून जाण्यात यशस्वी झाला.

**एक फरार**

आष्टी फाटा ते टाकरखेडा संभू रस्त्यावर दोन तरुण दुचाकीवरून चोरी करण्याच्या बेतात असल्याची गोपनीय माहिती वलगाव पोलिसांना 1 जानेवारी रोजी रात्री 10.30 वाजता मिळाली. माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक गजानन बोरवार यांच्यासह अन्य कर्मचारी घटनास्थळी गेले. त्यानंतर आष्टी ते टाकरखेडा संभू रस्त्यावर दोन तरुण अपघातग्रस्त ओमनी कारमधून साहित्य चोरतांना दिसले. त्यामुळे पोलिसांनी लोकेश पाटेकरला रंगेहात अटक केली. तर त्याचा मित्र शुभम गाडे हा तेथून पळून गेला. लोकेशची झडती घेतली असता त्याच्याकडून चारचाकी व दुचाकी जप्त करण्यात आली. वलगाव पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक गजानन बोरवार यांच्या फिर्यादीवरून लोकेश पाटेकर व शुभम गाडे यांच्यावर गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला आहे.




# रेझिंग डे निमीत्त शस्त्र प्रदर्शनी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 2 )** - 2 ते 8 जानेवारी या कालावधीत पोलीस वर्धापन दिन (रेझिंग डे) कार्यक्रम साजरा करण्यात येते. या निमीत्याने 2 जानेवारी रोजी 11 वाजता पोलीस कवायत मैदानावर पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी पोलीस वर्धापन दिन-2025 चे उद्घाटन केले. या रेझिंग डे निमीत्त शस्त्र प्रदर्शनी, सायबर, महिला व बाल अत्याचार, दामिनी पथक, बॉम्ब शोधक व नाशक पथक, डायल-112, दंगा नियंत्रण पथक, जलद प्रतिसाद पथक, श्वान पथक, बिनतारी संदेश विभाग, वाहतुक शाखा, फिंगर प्रिंट चे विविध स्टॉल लावुन पोलीस दलातील आधुनिक यंत्रसामुग्रीची माहिती विद्यार्थाना देण्यात आली.

**पोलिस वर्धापन दिन साजरा**

समाजातील वातावरण सुरक्षित राहावे, जनतेमध्ये पोलीस दलाप्रती विश्वास निर्माण होणे, तसेच शालेय विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम व सुरक्षिततेच्या दृष्टीने मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थांना शस्त्र व पोलीसांचे इतर कामकाजाबाबत माहिती देण्यात आली. सदर प्रदर्शनी पुढील 2 दोन दिवस पोलीस कवायत मैदान येथे खुली असुन त्याचा लाभ घेण्याचे आवाहन पोलीस आयुक्त यांनी केले. पोलीस वर्धापन दिना निमित्त उद्घाटन प्रसंगी पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, सागर पाटील, गणेश शिंदे, तसेच सर्व सहायक पोलीस आयुक्त व ठाणे व शाखा प्रभारी अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

# बडनेरा रेल्वे कार्यालयासमोरून वाहन लंपास

**अमरावती** – तक्रारदार महिलेने बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रेल्वे कार्यालयासमोर आपली ?क्टिव्हा उभी केली होती. ती अज्ञात आरोपींनी चोरून नेली. मोपेड वाहनाची किंमत 25 हजार रुपये असल्याचे सांगितले जात आहे. महिलेच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढिल तपास बडनेरा पोलीस करीत आहे.

# लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.2 )** - गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आला. या घटनेच्या तक्रारीवरून पोलिसांनी परवेज जमीर मुल्लाजी (22, जामठी, मूर्तिजापूर, अकोला) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शहरातील रहिवासी असलेल्या फिर्यादी तरुणीची सोशल मीडियावर आरोपीसोबत ओळख झाली. ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले. त्यानंतर मुलगी आणि आरोपी परवेज एकमेकांना भेटू लागले. त्यानंतर परवेज जमीरने तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. मात्र त्यानंतर मुलीने लग्न करण्याबाबत विचारणा केली असता त्याने लग्नास नकार दिला. त्यामुळे तरुणीच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी आरोपी परवेज जमीर मुल्लाजी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# ड्रेनेज लाईन लिकेज, सांडपाण्यामुळे आरोग्य धोक्यात

## पाणी पुरवठा पाईपलाईनमध्ये शिरले सांडपाणी

## राजेंद्र नगराजवळील फुलबासा नगरातील प्रकार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.2 )** - ड्रेनेज पाईपलाईन लिकेजमुळे सांडपाणी हे पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनमध्ये शिरत असल्याचा प्रकार राजेंद्र नगराजवळील फुलबासा नगरात उघडकीस आला आहे. पिण्याच्या पाण्यात हे दूषित पाणी शिरत असल्याने या परिसरातील नागरीकांच्या आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे. याकडे महापालिका प्रशासनाचेही दुर्लक्ष आहे. यासंदर्भात महादेव खोरी भागातील राजेंद्र नगरच्या बाजूला असलेल्या पुलबासा नगर येथील नागरिकांनी अमरावती महानगरपालिकेकडे तक्रार दिली आहे.



अमरावती महानगरपालिका अंतर्गत राजेंद्र नगरच्या बाजूला असलेल्या पुलबासा नगरातील एका घरामागील ड्रेनेज पाईप लाईन फुटलेली आहे. त्यामुळे नालीतील सांडपाणी हे लोकांच्या प्लॉटमध्ये जमा झालेले आहे. या ड्रेनेज लाईनच्या खाली पिण्याच्या पाण्याची पुरवठा करणारी पाईपलाईन आहे. या पिण्याचे पाईप लाईनमध्ये गटाराचे दूषित पाणी शिरत असून लोकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. या सदर्भात त्रस्त नागरिकांनी महानगरपालिका आयुक्त, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंता आणि उपविभागीय अभियंता यांना देखील तक्रारी केलेल्या आहेत. 21 में 2024 ला महानगरपालिका झोन क्रमांक 3 च्या बोबडे यांच्याकडे सुद्धा तक्रार करण्यात आली होती. मात्र त्यांनी ही बाब जीवन प्राधिकरणाच्या क्षेत्रात येत असल्याचे सांगितले. त्यामुळे याकडे कुणाचेही लक्ष नसून

परिस्थिती जैसे थे आहे. तरी ड्रेनेज लाईनचे असलेले लिकेज ताबडतोब बंद करावे अन्यथा आंदोलन केले जाईल अशी पुलबासा नगरातील नागरिकांची मागणी आहे.

# धारणी पोलीसांनी दिले 17 बैल, 12 गायींना जीवनदान



**महासागर प्रतिनिधी**

**धारणी,( दि.2 )** – सन 2024 वर्षा अखेरच्या पंधरा दिवसात धारणी पोलिसांनी गोवंश तस्करी रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवित 17 बैल व 12 गाईना जीवनदान दिले.12 गोवंश तस्करावर गुन्हे दाखल करून गोवंश तस्करांच्या मुसक्याही आवळल्या आहे.

पोलिसांनी धारणी येथून बारा गाईंना जीवनदान दिले तसेच अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. 29 डिसेंबर रोजी रात्रीच्या सुमारास धारणी पासून 40 किलोमीटर दूर डाबका गावात पोलिसांनी गुप्त माहिती वरून कत्तलीकरिता मध्यप्रदेश येथून हिवरखेड जाणाऱ्या 16 गोवंशाची खेप पकडून तस्करांमध्ये दहशत निर्माण केली आहे. अंमलदार मोहित सोमेश्वर आकाशे यांच्या फिर्यादीवरून आरोपी मजरुद्दीन अझरुद्दीन (रा.चीचारी, ता.तेल्हारा) यास अटक केली तसेच फरार आरोपी जफरुद्दीन



अझरुद्दीन,अब्दुल शरीफ अब्दुल लतीफ, शेखलाल शेख जाफर, मो वाहिद मो शाहिद, साकिब खा नासिर खा, झहीर खान जबी खा, शेख अवेज शेख इमाम, अन्सार खा समशेर खा, उबेद उद्दीन नईमुद्दीन (सर्व राहणार हिवरखेड ता.तेल्हारा जि.अकोला) यांचे वर महाराष्ट्र पशुसंवर्धन अधिनियम तसेच महाराष्ट्र छळ प्रतिबंधक अधिनियम कायद्यान्वये कार्यवाही करून 2 लाख 46 हजार रुपयांचे गोवंश जप्त केले. त्यांना वंदे मातरम गोशाळा बाबंदा या ठिकाणी सुरक्षित ठेवण्यात आले.

अटक आरोपी मजरुद्दीन अझरुद्दीन यास कोर्टापुढे हजर केले असता कोर्टाने त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. यासह वर्षाच्या शेवटच्या दिवशी हरीसाल गावातून प्रवासी ऑटोमध्ये एक गोवंश बैल कोंबून नेत असलेले वाहन पकडून दोन आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला. संबंधीत वाहन जप्त करण्यात आले असून या वर्षा अखेर केलेल्या धारणी पोलिसांच्या कारवायामुळे तालुक्यातील गोवंश तस्करांचे धाबे चांगलेच दणाणले आहे. धारणी पोलीसांकडून इतर फरार आरोपींचा शोध सुरू आहे. ही कार्यवाही पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या आदेशाने ठाणेदार अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनात पीएसआय सतीश झाल्टे, हंकारे, नितीन बोरसिया, मोहित आकाशे,जगत तेलगोटे,राम सोळंके,कृष्णा यांनी केली.

# जिल्हयात होणार दोन लक्ष शोषखड्डे

## 10 जानेवारी 2025 पर्यंत शोषखड्डे निर्मीतीसाठी विशेष मोहीम






### भुर्गभातील जलस्तर वाढणार

शोषखड्डयांच्या निर्मीती मुळे भुगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होवून पाण्याचे दुर्भिष्य या मुळे दुर करता येईल. सदरच्या विशेष मोहीमेमध्ये जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाअंतर्गत कार्यरत बीआरसी / सीआरसी सर्व सल्लागार यांनी उत्कृष्ट पध्दतीने मोहिम राबवावी. याकरिता सर्वतोपरी प्रयत्न करावेत. अशा सुचना जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय खारकर यांनी दिल्या आहेत.

ग्रामस्थांनी मनरेगामधून सांडपाण्याच्या व्यवस्थापनासाठी शोषखड्डे करण्याकरिता पुढाकार घ्यावा.

**संजिता मोहोपात्रा,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** – पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातर्फे अमरावती जिल्ह्यात 10 जानेवारी 2025 पर्यंत दोन लक्ष शोषखड्डे पुर्ण करण्याचे उद्दीष्ट देण्यात आले आहे. याकरिता मनरेगा योजनेतून मॅजिक पिट, साधा शोषखड्डा कुटुंबस्तरावर तयार करुन त्या कुटुंबाच्या सांडपाण्याचे व्यववस्थापन त्याच कुटुंबाने करावयाचे आहे. या योजनेचा लाभ घेवून जास्तीत जास्त ग्रामस्थानी सांडपाण्याच्या व्यवस्थापनाकरिता कुटुंबस्तरावर वैयक्तीक शोषखड्डे तयार करावे, जेणे करुन भूगर्भातील पाण्याची पातळी सुध्दा वाढण्यास मदत होईल, असे आवाहन अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी केले आहे.

याबाबत जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी बाळासाहेब बायस यांनी सुध्दा सदर मोहीमेत प्रत्येक कुटुंबाने वैयक्तीक शोषखड्डे तयार करावेत, याकरिता जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांनी सदरच्या विशेष मोहीमेत मोठया प्रमाणात ग्रामपंचायतीमध्ये शोषखड्डयांची निर्मीती करावी, असे आवाहन केले आहे. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामार्फत गावांमध्ये एएलडब्ल्युएम प्रकल्प राबविल्या जात असून, सदर प्रकल्पा अंतर्गत जिल्हाभरात जवळपास 3 हजार सार्वजनिक शोषखड्डे तयार करण्यात आले आहेत. तर वैयक्तीक स्तरावर जिल्हाभरात 90 हजार वैयक्तीक शोषखड्डे तयार करण्यात आले. यामध्ये जिल्हातील 4 लक्ष कुटुंबांपैकी 2 लक्ष कुटुंबाच्या सांडपाण्याचे व्यवस्थापन होत आहे. उर्वरित 2 लक्ष कुटुंबाच्या सांडपाण्याच्या व्यवस्थापनाकरिता सदरची विशेष मोहीम महत्वाची आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# तलाठी कार्यालयाला ठोकले कुलूप

## मजुरी न मिळाल्याने आदिवासी बांधव आक्रमक

## हतरु येथील घटना





**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.2 )-** रोजगार हमी योजनेअंतर्गत 300 दिवस काम करुनही रोजंदारीवर काम करुनही मजूरी न दिल्याने संप्तत मजूरांनी तलाठी कार्यालयाला कुलूप ठोकल्याचा प्रकार हतरु ग्रामपंचायत अंतर्गत चिलाटी येथे घडला.

रोजगार हमी योजनेअंतर्गत सन 2023 मध्ये 300 मजुरांनी रोजंदारीच्या कामावर काम केले होते. परंतु त्यांच्या कामाची मजुरी अद्याप मिळालेली नसल्यामुळे गावातील नागरिकांनी व उपसरपंच भैयालाल मावसकर यांनी वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा केला. वारंवार संबंधित मजुरी देण्याची मागणी केली, परंतु मजुरी न मिळाल्याने गावकरी व भैय्यालाल मावस्कर यांनी 2 जानेवारी रोजी ताला ठोको आंदोलन करण्याचा इशारा प्रशासनाला दिला होता. या इशाऱ्यानंतरही प्रशासनाने मजूरांची मजूरी न दिल्याने अखेर आक्रमक आदिवासी बांधवांनी गुरुवारी हतरु येथे असलेल्या तलाठी कार्यालयाला कुलूप ठोकले. यावेळी तीनशेच्या वर मजूर उपस्थित होते. भैय्यालाल मावस्कर यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.

# सामाजिक संस्थांची मोट बांधून विविध प्रकल्प उभारणार बच्चू कडू!

## राहून गेलेल्या योजना मार्गी लावणार



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** – महाराष्ट्रामध्ये शेतकरी, गरजवंत लोकांसाठी झटत असलेल्या संस्थांची मोट बांधून राज्यभरात विविध प्रकल्प उभारण्याची योजना प्रहार संस्थापक बच्चू कडू यांनी आखली आहे. त्यांनी बुधवारी(दि.1) रोजी जेष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांची भेट घेत विविध विषयांवर चर्चा केली, आणि एका छताखाली सर्व संस्थांना घेवून बहुउद्देशिय प्रकल्प हाती घेण्याचे प्राथमिक नियोजन केले.

बच्चू कडूंनी सांगितले की, आमदार असताना कामाच्या व्यापामूळे अनेक अश्या जनहिताच्या योजना आहेत, ज्या शासनाच्या मर्यादेत येत नाहीत, परंतू सामाजिक संस्थांना करणे सहज शक्य आहे, अश्या जनहिताच्या मोठ्या योजना देशातील नामांकित संस्थांच्या साथीने उभारुन त्या पुर्णत्वास नेण्याची योजना आखण्यात आली आहे. बच्चू कडू हे पुणेतील प्रहार रुग्णसेवक नयन पुजारी, नौशाद शेख यांनी गरिबांसाठी फक्त 30 रुपयांत ओपीडी असलेल्या एका हॉस्पिटल च्या उदघाटना निमित्ताने पुणे दौऱ्यावर होते. योगायोगाने जेष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या वाढदिवसानिमीत्त बच्चु कडू यांनी नानां ना दूरध्वनी द्वारे शुभेच्छा दिल्या. नानांनी बच्चु कडू यांना घरी भेटायला येण्यास निमंत्रण दिल्यानंतर सायं 6 वाजता बच्चु कडू यांनी नाना पाटेकर यांच्या डोणजे येथील निवासस्थानी जाऊन नानांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी दोघांमध्ये जवळपास तासभर विविध विषयांवर चर्चा झाली. स्वामिनाथन आयोगापासून ते शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर मंथन झाले. यातून राज्यातील व राज्याबाहेरील संस्थांना एकत्र आणून शेतकरी, पाणी, माती, प्राणी यांच्या संरक्षणार्थ काम करण्यावर चर्चा झाली. तसेच गरजवंताकरिता नाममात्र पैश्यांमध्ये महागड्या सुविधा कश्या उपलब्ध करवून द्यायच्या, यावरही चर्चा करण्यात आली. यावेळी बच्चु कडू यांच्यासोबत आलेले त्यांचे चिरंजीव देवा कडू यांची सुद्धा नानांनी आपुलकीने चौकशी केली. बच्चु कडू यांच्या समवेत उद्धव ढवळे, महेश बडे, मनोज भोजने आदी उपस्थित होते. दरम्यान बच्चू कडू यांनी पुणेला पाणी पुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण येथे सदिच्छा भेट दिली. बच्चु कडू यांना खडकवासला धरणाची माहिती शाखा अभियंता गिरीजा कल्याणकर-फुटाणे व इतर कर्मचाऱ्यांनी दिली. दरम्यान, बच्चु कडू यांनी त्यांच्या अगदी जवळचे असणारे उद्धव ढवळे यांच्या आईची भेट देऊन प्रकृतीची चौकशी केली.

# दिव्यांग मेळाव्यात साहित्याचे वाटप



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड ( दि.2 )-** येथील अष्टविनायक सभागृहात जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून 30 डिसेंबर 2024 भव्य दिव्यांग मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन आणि दिव्यांगांना वस्तूचे वाटप करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिलीप भुयार, उद्घा टक म्हणून डॉ.नीलकंठ यावलकर यांचे हस्ते उद्घा टन पार पडले, तसेच या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून सोमेश्वर शहाणे, अनिल ठाकरे, अपंग वित्त महामंडळ सचिव आशिष देशमुख तर सवेरा फाऊंडेशनचे अनुप जैन व भारत भारती उपस्थित होते. यावेळी शेकडो दिव्यांगांना काठी, सायकल, शिलाई मशीन भेट देण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला नवनिर्वाचित आमदार चंदू उर्फ उमेश यावलकर यांनी सुध्दा हजेरी लावली. यावेळी दिव्यांग बांधवानी आपल्या मागणीचे निवेदनही त्यांना दिले. आ.यावलकर यांचा यावेळी शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

विशेषत: पट्टणच्या घाटामध्ये ट्रॅक्टर पलटी होऊन जरुड येथील नलिनी राऊत यांच्या पतीचा मृत्यू झाला असून अशा गरजू महिलेला खंडेलवाल ज्वेलर्सच्या वतीने इलेक्ट्रिकल शिलाई मशीनचे वाटप खंडेलवाल ज्वेलर्सच्या एच आर मॅनेजर अश्विनी अटलोये, दिपक निंबाळकर व रोहित धोटे यांचे हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आली. तर संजय देशमुख यांचे कडून दिव्यंगांना कपडे वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमात अनेक वर्षापासून अपंगांसाठी झटणारे व कार्यक्रमाचे आयोजक जिल्हासचिव राजेंद्र घाटोळे यांचा सुद्धा असंख्य अपंग कार्यकर्त्यांनी सत्कार केला. तसेच दिव्यांग बांधवांच्या जेवणाची व्यवस्था जयपाल जैन यांनी केलेली होती. यावेळी कार्यक्रमाचे सूत्र संचालन दिपक निंबाळकर यांनी तर आभार जितेंद्र शेटिये यांनी मानले.

## कपाटातून 41 हजार रुपयांचा माल लंपास

**अमरावती** – वरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सूर्या कॉलनी येथील एका घरातून चोराने 41 हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. जया अनिल आगरकर (वय 45) या घराला कुलूप लावून ड्युटीसाठी गेल्या होत्या. दरम्यान, अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले,

# नागपूरचे गोल्फर अजित इंगोले आणि रिना सिंग ठरले विजेते

## एएससी इन्व्हिटेशनल गोल्फ कप चे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.2 )-** जिल्ह्यातील बेलोरा येथील अंबानगरी स्पोर्ट्स सिटी (एएससी) तर्फे आयोजित पहिल्या एएससी इन्व्हिटेशनल गोल्फ कप स्पर्धेत नागपूरकर अजित इंगोले हे ओपन ग्रॉस विभागात विजयी ठरले, तर रीना सिंगने महिला विभागात विजेतेपद पटकावले.

एएससी तर्फे घेण्यात आलेली ही स्पर्धा शहराच्या क्रीडा क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा ठरली. भारतातील एकमेव खाजगी गोल्फ कोर्स येथे झालेल्या या स्पर्धेत अमरावती आणि नागपूरमधील 36 गोल्फपटूंनी सहभाग घेतला होता. काझी अहमद आणि फरदीन यांना उपविजेते म्हणून सन्मानित करण्यात आले आणि ग्रुप कॅप्टन आर. एन. भट यांनी नेट विनर ट्रॉफी जिंकली. मोनिका मेंडेकर यांनी क्लोजेस्ट टू द पिन पारितोषिक जिंकले. गार्गी विद्यार्थी यांनी मोस्ट बर्डीज अँड पार्सचा पुरस्कार जिंकला. याप्रसंगी भव्य समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात एएससीच्या उत्कृष्ट सुविधांवर प्रकाश टाकण्यात आला. एएससी चा 45 एकरचा विस्तीर्ण हिरवागार प्रदेश अतुलनीय लक्झरी आणि सुविधा देतो. एएससी चे संचालक गोल्फर शैलेश जोग यांनी सहभागींचे आभार मानले आणि गोल्फला प्रोत्साहन देण्यासाठी अशा कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

# कुराश स्पोर्ट्स असोसिएशनच्या विद्यार्थ्यांची निवड

**महसागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.2 )** – क्रिडा व युवक सेवा संचालनालय, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या अंतर्गत आयोजित शासकीय विभागीयस्तर कुराश स्पर्धा नुकतीच बुलढाणा येथे संपन्न झाली. यात चांदूर रेल्वे येथील नामवंत कुराश स्पोर्ट्स असोसिएशनचे विद्यार्थी 14 व 17 वयोगटात स्मित बन्सोड, सांजवी वानखडे, शिल्पा मुधोळकर, प्रिया धने, रियाकशी डोंगरे, उत्कर्षा भेंडे, आदित्य वानखडे, अभिलाष अढाऊ, आयुष चौधरी या सर्व विद्यार्थ्यांनी आपआपल्या वयोगटामध्ये सर्वांचे लक्ष वेधत शालेय राज्यस्तरीय कुराश स्पर्धेकरिता मानाचा तुरा रोवून चांदूर रेल्वे नगरीचे नाव उंचावले. या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल भाजपा धामणगाव विधानसभा प्रमुख रावसाहेब रोठे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच संस्थेचे अध्यक्ष गणेश रॉय, कोषाध्यक्ष अशोक मोटघरे, सचिव संदिप देशमुख, ॲड.मनोज अंबाडकर, उमेंद्र ढगे, सुरेश तिखे, बच्चू वानरे, प्राविण्य देशमुख, पप्पू भालेराव, एस.टी. तायडे, समीर जानवाणी, कपिल धामणकर, श्रीकांत मोधळे ,भाग्यश्री सोळंके आदींनी खेळाडूंचे कौतुक करीत शुभेच्छा दिल्या.

# एलोरा नॅचरल सीड्स कडून शेतकरी बांधवांचा सन्मान

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.2 )-** किसान सन्मान सप्ताह निमीत्त प्रगतशील शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय किसान दिनाचे औचित्य साधून एलोरा नॅचरल सीड्स कंपनी चे एमडी किशोर वीर यांच्या संकल्पनेतून दरवर्षी प्रमाणे 23 ते 31 डिसेंबर 2024 या कालावधीत किसान सन्मान सप्ताह आयोजित करण्यात येतो. या निमित्ताने अमरावती जिल्ह्यातील घोगर्डा, अंजनगांव सुर्जी येथील प्रगतशील शेतकरी पराग पटेल यांच्या एलोरा सफेद कांदा प्लॉट वर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वेळी शेतकरी बांधवांचे एलोरा नॅचरल सीड्स परिवारातर्फे स्वागत आणी सन्मान करण्यात आला. या वेळी कंपनीचे एएसएम राम नगरकर, एसओ विठ्ठल साबळे, अंकुश एग्रो चे गंगाधर जी, गाडगेबाबा कृषी केंद्राचे राजू धोटे, महावीर अग्रो, गुलाबाबा बीज भंडार, व प्रगतशील शेतकरी तरुण पटेल, वैभव पटेल यांनी उपस्थित सर्व शेतकरी बांधवांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# पेट्रोल पंपावर खाजगी बस स्थानक

## नागरिकांसह प्रवाशांचे जीव धोक्यात ■ अनेक खाजगी बस चे परवाना मुदतबाह्य



**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.2 )-** शहरात खाजगी बसेसची दहशत दिवसेंदिवस वाढत जात असून नागरिकांना या बसेसचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. येथील राज्य परिवहन रस्ते महामंडळाच्या (एसटी) बसस्थानकासमोर असलेल्या पेट्रोल पंपावर खाजगी बसेसचे अघोषीत बस स्थानक आहे, जे परवाड्यातील नागरिक व प्रवाशांकरिता धोकादायक ठरत आहे. या सगळ्या प्रकारावर येथील पोलिसांचा वाहतूक विभाग व प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे.

परतवाडाहून अमरावती, अंजनगाव, अकोट मार्गे अकोला, धारणी, खंडवा, बऱ्हाणपूर, घटांग पासून चुरणी, जारीदा, परतवाडा ते बैतूल, मोर्शी, वरुड मार्गावरून पांढुर्णा मार्गावर दिवस मावळल्यापासून ते रात्र होईपर्यंत खाजगी बसेसच्या फेऱ्या सुरू असतात. परतवाड्याहून विविध मार्गावर धावणाऱ्या अधिकांश खाजगी बसांची परवाना मुदत संपल्यावरही धावत आहे. हा प्रकार कुणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, हे कळायला मार्ग नाही. नियमांची पायमल्ली होत असल्याने नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. जिल्हा प्रादेशिक परिवहन अधिकारी, ग्रामीण पोलीस अधीक्षक, शहर पोलीस आयुक्त, पोलीस वाहतूक विभाग यांच्या नजरेसमोर खाजगी बस संचालकांकडून हा सर्व खेळ सुरु असताना तेरी भी चूप, मेरी भी चूप, असा प्रकार येथे सुरु आहे. नियमांची पायमल्ली करणाऱ्या सामान्य नागरिकांवर पोलिसांकडून कारवाई केली जाते, परंतू मृत्यू बनून धावणाऱ्या व अनधिकृत ठिकाणी आपले स्थानक बनविणाऱ्या या बसेस कारवाई होणार की, नाही हे पाहण्यासारखे राहील.

### आरटीओ, पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

जिल्हा प्रादेशिक परिवहन कार्यालयातील आरटीओ पथक हरपले तरी कोठे?, दिवसरात्र धावणाऱ्या खाजगी बसेसच्या कागदपत्रांची तपासणी करण्याची जबाबदारी घेणारे विभागच झोपेत असेल, तर बस संचालकांच्या मुसक्या आवळणार कोण? असा सवाल नागरिक विचारित आहे.

### एसटी बस स्थानकात घूसून प्रवाशांची चोरी

या खाजगी बसचे वाहक थेट एसटी बस स्थानकात शिरुन प्रवाशांना आपल्या बसमध्ये घेवून जातात. परतवाडा डेपोमध्ये एसटी बसची संख्या कमी असल्याने प्रवाशीसुध्दा कंटाळून खाजगी बसने जात आहे.

### पेट्रोल पंप की, जिवंत बॉम्ब!

एसटी बसस्थानकासमोर पेट्रोलपंपावर असलेले खाजगी बसचे स्थानक जीवंत बॉम्बपेक्षा कमी नाहीत. पेट्रोलपंपावर ज्वलनशील वस्तू, विस्फोटक पदार्थ नियमानुसार नेता येत नाही. मोबाईलचा वापर, बिडी, सिगारेट पेटविणे धोक्याचे असते. पेट्रोल पंपावर अवैधरित्या असलेल्या हे खासगी बस स्थानक धोकादायक ठरत आहे.

## जाहीरनोटीस

अर्जदार :- इंदू नामदेवराव काकडे, रा. अंबाडा, ता. मोर्शी, जि. अमरावती

विरूद्ध

गैरअर्जदार :- निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत कार्यालय मालखेड

याद्वारे गावातील सर्वत्र लोकांना जाहीरपणे सुचित करण्यात येते की, अर्जदार इंदू नामदेवराव काकडे, (लग्नानंतरचे नांव) रा. अंबाडा ता. मोर्शी जि. अमरावती ह्यांनी स्वत:चा नामे इंदू मारोती मानकर ह्यांचा जन्म, मालखेड, ता. चांदूर रेलवे जि. अमरावती येथे दिनांक २७-०७-१९५९ रोजी झालेला असून अनावधानाने जन्माची नोंद करण्यात आलेली नसल्यामुळे, जन्माची नोंद निबंधक तथा सचिव, ग्रामपंचायत कार्यालय, मालखेड येथे करण्यातकरीता आदेश मिळण्याबाबतचा अर्ज या कार्यालयास दाखल केलेला आहे.

सदर जन्माची नोंद करून देण्यास कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कोणत्याही प्रकारचा आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून एक (१) महिन्याचे आत आपला आक्षेप लेखी स्वरूपात या कार्यालयामध्ये दाखल करावा. मुदतीनंतर प्राप्त आक्षेप, हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर जाहिरनामा आज दिनांक १२/१२/२०२४ रोजी माझ्या सही व न्यालयाचे शिक्कयानिशी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

कोर्ट शिक्का

**तहसीलदार**
**तथा तालुका दंडाधिकारी चांदूर रेल्वे**

## जाहीरनोटीस

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार साबीर खान तपरुउल्ला खान रा. अंजनगांव ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील रहीवाशी आहेत. त्यांच्या मुलगा जन्माची नोंद नगरपरिषद अंजनगांव येथे रजिस्टरमध्ये जन्माची नोंद नसल्याने त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माच्या नोंदीचे आदेश होण्याबाबतचा विनंती अर्ज या कार्यालयात दि. २६.०८.२०२४ रोजी सादर केला आहे.

त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरून जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात येत आहे जाहीद खां साबिर खा यांचा जन्म अंजनगांव येथे ३-४-१९९३ रोजी झाला आहे. त्याबाबत कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार असल्यास किंवा प्रकरणात काही म्हणावयाचे असल्यास त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत स्वत: अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत अन्यथा ३० दिवसानंतर जर कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

कोर्ट शिक्का

**कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब**
**तहसीलदार ( महसूल ) अचलपूर**

## जाहीरनामा

उपरोक्त विषयांन्वये आपणास कळविण्यात येते की, रा.मा.क्र. एमआरसी-८१/बेनोडा, अमरावती/४५७४/२०२३-२०२४ मध्ये अर्जदार अमीत राजू तायडे रा. भिमटेकडी जवळ, बेनोडा, जहांगीर, अमरावती ता. जि. अमरावती यांनी यांचे आजोबा नामे नामदेवराव लहूजी तायडे यांचा मृत्यू दि. ०७.१०.२०२२ रोजी राहते घरी बेनोडा जहांगिर येथे झाला असून यांच्या मृत्यूच्या नोंदीचा आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात प्रकरण दाखल केले आहे. निबंधक जन्म मृत्यू, महानगर पालिका अमरावती ता.जि. अमरावती येथे घेतली नाही. अर्जदाराला उपरोक्त मृत्यू प्रमाणपत्राची गरज असल्यामुळे मृत्यूची नोंद महानगर पालिका अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम ९ (३) नुसार मृत्युच्या नोंदणीचा आदेश होणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अनुषंगाने अर्जदार राजू तायडे रा. भिमटेकडी जवळ, बेनोडा जहांगीर अमरावती ता. जि. अमरावती यांनी यांचे आजोबा नामे नामदेवराव लहुजी तायडे यांचा मृत्यू दि. ०७.१२.२०२२ रोजी राहते घरी बेनोडा जहांगीर येथे झाला किंवा कसे तसेच मयत नामे नामदेवराव लहुजी तायडे यांचे वारस (पती, मुलगा, मुलगी) कोन्ही असल्यास त्यांचे सदर आदेशाबाबत आक्षेप नसल्याबाबत प्रतिज्ञापत्रासह गृहचौकशी करून अहवाल ७ दिवसाच्या आत या कार्यालयात सादर करावा.

कोर्ट शिक्का

**नायब तहसीलदार ( महसूल )**
**अमरावती**

## जाहीरनामा/सायटेशन

दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
श्री. पी.ए. पाटील यांचे न्यायालया
८वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, अमरावती
किरकोळ अर्ज/२४७४/२०२४
Nilima Sanjay Adhau + ०२ वि. Nil
पुढिल तारीख : १०-०१-२०२५

बनाम :- सर्वत्र लोकांना

अर्जदार :- 1) Nilima Sanjay Adhau, Age- 50 Years, Occu.- Household. Address- R/o. Laghuvetan Colony, Congress Nagar Road, Po. Rukhmini Nagar, Amravati ,Tq. and Dist. Amravati, 2) Saurabh Sanjay Adhau, Age- 24 Years, Occu- Education, R/o. Laghuvetan Colony, Congress Nagar Road, Po. Rukhmini Nagar, Amravati ,Tq. and Dist. Amravati, 3) Monika Sankesh Gawande (Before Marriage Name Monika Sanjay Adhau) Age- 29 Years, Occu.- Household, R/o. 102, Jasmine Shiv elite Township, Shankarpur Wardha Road, Nagpur, Tq. and Dist. Nagpur.

**विरूद्ध**

गैरअर्जदार :- NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Sanjay Manikrao Adhau हे दि. २१-०९-२०२४ रोजी PDMC Hospital, Amravati येथे मयत झाले. अर्जदार Nilima Sanjay Adhau+ 02 रा. वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत Sanjay Manikrao Adhau यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIR-SHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा अर्जदार Nilima Sanjay Adhau+ 02 रा. वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत Sanjay Manikrao Adhau यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०२-१२-२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय ( वरिष्ठ स्तर ) अमरावती**